# कोरोना काळातील आशा सेविकांचे काम व अडचणी

प्रा.डॉ.स्वाती दळवी
गुलाम नबी आझाद समाजकाय महाविद्यालय, पुसद, जि. यवतमाळ
Swatiwath75@gmail.com

*कोरोना काळात जगातील सर्वच स्तरातील जीवनमान विस्कळीत झाले. जनजीवनाचे एकंदरीच नियोजन या काळात कोलमडून पडले अनेकांच्या कुटुंबातील जीवाभावाची माणसे या काळात कोरोनामुळ दगावली. अशाही गंभिर संकट काळात काही घटक आपले आरोग्य धोक्यात घालून समाजाच्या सेवेसाठी सातत्याने प्रयत्न करीत होती. त्यातील महत्त्वाचा घटक म्हणजे आषा सेविका. या आशा सेविकांनी स्वतःसह कुटुंबातील सदस्यांचा विचार करता या कोरोना विरूद्धच्या लढाईत जीवाची बाजी लावत कणखरपणे सेवा दिली. तुटपुंजे मानधन, अपुऱ्या सोयी–सुविधा, लोकांचा रोश सगळ सांभाळत गावागावात आशा सेविकांनी केलेले कार्य व दिलेल्या सेवा यामुहे ग्रामिण भागात कोरोना नियंत्रणात ठेवण्यास व कोरोना रूग्णांना वेळेत उपचार मिळण्यास मोठा आधार मिळाला.*

## अध्ययनाचे उद्देश

1) कोरोना काळात आशा सेविकांच्या वाढलेल्या जबाबदारीचे अध्ययन
2) कोरोना काळात दिलेल्या मानधनाबाबत समाधानता
3) कोरोना काळात लोकांचे सहकार्य व रोष याबाबतचे अनुभव
4) कोरोनानंतर शासनाकडून अपेक्षाचे अध्ययन

## आशा सेविका

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत ग्रामस्तरावर आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी आशा सेविकांचा उपयोग होतो. ग्रामीण जनता व आरोग्य केंद्र यांच्यामध्ये मध्यस्थीचे महत्वाचे काम आशा सेविका करतात.

गैर आदिवासी भागात 1500 लोकसंख्येमागे एक आशा नियुक्त करण्यात येते तर आदिवासी भागामध्ये 1000 लोकसंख्येमध्ये एक आशा नियुक्त करण्यात आली आहे.

## आशा सेविकांचे कामे

– ग्रामीण भागातील लोकांना स्वच्छता, लसीकरण यांचे महत्व पटवून देणे.
– ताप, डायरिया, लहान मोठया जखमा गावातील प्राथमिक उपचार करणे.
– DOTS, Follic Acid आणि Chloroquin सारख्या इतरही गोळयांचे वाटप करणे.
– आरोग्यविषयक गंभिर परिस्थिती निर्माण झाल्यास त्याची माहिती संबंधित यंत्रणेला देण्याची जबाबदारी.
– ग्रामीण महिलांना बाळंतपण, स्तनपान, माता व बालकांचे लसीकरण, गर्भप्रतिबंध उपाय योजना, जननेद्रियांशी संबंधित जंतूसंसर्ग
– नवजात अर्भकाची काळजी इ. बाबत मदत व मार्गदर्शन. –

## आशा सेविकांना मिळणारे मानधन

आशांना कामावर आधारीत मोबदला धरून सध्या सरासरी 2500 रूपये दरमहा मानधन मिळते तर गट प्रवर्तकांना टीए, डीए म्हणून मासिक 8724 रूपये मिळतात. हे मानधन अत्यंत अल्प आहे.

गट प्रवर्तक व आशा सेविकांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा दया ही मागणी फार पूर्वीपासून केली जाते.

आशांना दिले जाणारे मानधन हे दारिद्रयरेषेखालील व किमान वेतनाखालील असून त्यांना वेठबिगारासारखे वागविले जाते असा आरोप होतो.

2021 मध्ये शासनाकडून आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तक यांना राज्य शासनाच्या निधीतून 3000रु. व 3000रु. असे मानधन देण्यात येत होते. कोरोना काव्यानंतरच्या त्यांच्या कार्याचे स्वरुप व गरज ओळखून यात शासनाने वाढ केली आहे. आता त्यांना अनुक्रमे 3000 व 4000 रू तसेच प्रतिमाह 500 रू. कोवीड भत्ता करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सध्या आशा सेविकांना 6500 तर आशा गट प्रवर्तक यांना 13475 रू मानधन दिले जाते.

## कोरोनाकाळात वाढलेल्या जबाबदारी

कोरोनाच्या काळात व त्यानंतरही आशा स्वयंसेविकांच्या कार्यात प्रचंड वाढ झालेली दिसून येते.

– कोरोना काळात परोपरी जावून सर्वेक्षण करणे.
– कोरोना वैद्यकिय सेवा पुरविणे.
– क्यारटाईन असलेल्या कोरोना रूग्णाला कोणती लक्षणे दिसतात याबाबत रोज अहवाल देणे.
– आरोग्य केंद्रावर लोकांना तपासणीसाठी आणणे.
– लसीकरणासाठी जनजागृती करणे.
– लसीकरण केंद्रावर मदतनिस म्हणून काम करणे.
– कोरोनाच्या तिसऱ्या लाटेत बालकांचे सर्वेक्षण करणे अशी कामे आशा स्वयंसेविकांना आपला जीव धोक्यात घालून केली आहेत. कोदिड–19 च्या काव्यात केलेल्या कार्याची दखल घेत WHO ने

2022 च्या ग्लोबल हेल्थ लिडर अवार्ड साठी भारतातल्या आशा स्वयंसेविकाची निवड केली आहे.

**कोरोना काव्यातील लोकांचे सहकार्य, रोष व अडचणीचे अध्ययन**

अध्ययनासाठी निवडलेल्या पुसद तालुक्यातील आशा स्वयंसेविकाच्या मते कोरोना काळात प्रचंड काम करूनही आशा स्वयंसेविकांचा आरोग्यविषयक सुविधाची काळजी फारशी घेतल्या गेलीच नाही. त्यांना मास्क देण्यात आलेत का? या प्रश्नाने होकारार्थी उत्तर केवल 30 टक्के आशांनी दिले तर निययझर, ग्लोज, पिपीई फीट आशी सुरक्षा साधने 70 टक्के आशा सेविकांचे महणणे आहे.

अध्ययनासाठी निवडलेल्या 75 आशा सेवकांपैकी 60 टक्के आशांना कोरोना बळी पडावे लागले आणि सुविधा पुरवल्या गेल्या नसल्याने त्यांच्यात नाराजीची भावना आहे.

**शासनाकडून अपेक्षा**

–आशा सेविकांना शासनाच्या कर्मचाऱ्याप्रमाणे दर्जा देण्यात यावा.

–मानधनाचे रूपांतर पगारात करण्यात यावे.

–आरोग्यविषयक सुविधा पुरविण्यात याव्या

–कामाचे स्वरूप व कार्यस्थिती बाबत सुरक्षितता प्रदान करण्यात यावी.

**निष्कर्ष**

–आशा स्वयंसेवकाच्या कार्याची गरज ओळखून त्यांना भरीव मानधन देण्यात यावे असे बहुसंख्य मत आहे.

–आशा सेविकांनी कोरोना का केलेल्या कार्याची दखल घेवून त्यांना त्या कामासाठी आर्थिक लाभ दिले जावेत असे अधिकाधिक उत्तरदात्यांना वाटते.

–आशांचे कामाचे स्वरूप घेवून त्यांना सुरक्षितता प्रदान करण्यात यावी.

**संदर्भ**


1. www.BBC.com आशा वर्कस **कोण** असतात.
2. https://bolbhidu.com आशा सेविकांचे जागतिक आरोग्य संघटनेने कौतुक केलय पण आशा सेविका समाधानी आहे का?
3. https://puralindiaoline.org कोरोना काळात अखंड आशा
4. https://b01bhida-com